**शिक्षकांकरिता वरिष्ठ व निवड श्रेणी लागू करणेबाबत तसेच प्रशिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शिप्रधो-२२१७/प्र.क्र.३९/२०१७/प्रशिक्षण**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २३ ऑक्टोबर, २०१७**

**वाचा :** शासन निर्णय पाटीसी १०९७/(३९७/९७)/माशि-४ दिनांक २९ जून, २००२.

**प्रस्तावना :**

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २९ जून, २००२ च्या शासन निर्णयानुसार माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीकरिता सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना निवड श्रेणीसाठी आवश्यक असणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणांच्या योजनेस सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली होती.

तथापि, मागील दोन वर्षात राज्यातील १००% मुले शिकण्याच्या दृष्टीने व १० व्या वर्गापर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५% पेक्षा खाली आणण्याच्या हेतूने शासन पातळीवर विविध निर्णय घेण्यात आले आहेत. शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ व दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ अन्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम राबविण्यात येत असून शिक्षण हक्क कायद्याच्या तरतूदीप्रमाणे, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विद्याप्राधिकरण तसेच जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD) पुनर्रचित करण्यात आले आहेत. या सर्व निर्णयांमुळे विभागातील प्रत्येक कृतीचा परिणाम मुलांच्या शिकण्यात होतो हे पाहण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

पूर्वीपासून विभागांतर्गत घेण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम हे मुलांच्या शिकण्याची पातळी वाढविणे आणि विद्यार्थी नापास होण्याचे प्रमाण कमी करण्याच्या हेतूनेच करण्यात येत होते. परंतू घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणांचे उद्दिष्ट स्पष्ट असणे, त्यांचे मापन करता येणे, प्रशिक्षण झाल्यावर ठराविक कालावधीत परिणाम मिळणे, पर्यवेक्षण व मूल्यमापनाच्या माध्यमातून परिणाम प्राप्त झाल्याचे पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षकांच्या वरिष्ठ व निवड श्रेणी लागू करण्याकरिता प्रशिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय दिनांक २९ जून, २००२ तसेच वरिष्ठ / निवड श्रेणी संदर्भातील अन्य अनुषंगिक शासन निर्णय या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी (१२ वर्षे) व निवड श्रेणी (२४ वर्षे) करिता जे शिक्षक पात्र होत असतील अशा शिक्षकांना या वर्षापासून नवीन स्वरुपात प्रशिक्षण दिले जाईल. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना

वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी आवश्यक असणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या सुधारित योजनेस मान्यता देण्यात येत असून, या योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे असेल.

१. वरिष्ठ वेतन श्रेणी (१२ वर्षे) अथवा निवड श्रेणीमध्ये (२४ वर्षे) पात्र होणाऱ्या शिक्षकांची यादी संबंधित शिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत जाहिर करण्यात यावी व या यादीनूसार DIECPD व विद्याप्राधिकरण यांनी प्रशिक्षणाचे नियोजन करावे.
२. शासनातर्फे मान्यता देण्यात आलेल्या व विद्याप्राधिकरणातर्फे घेण्यात येणारे जे प्रशिक्षण कार्यक्रम वरिष्ठ व निवड श्रेणी करिता लागू राहतील. असे प्रशिक्षण कार्यक्रम विद्या प्राधिकरणातर्फे जाहीर करण्यात येतील.
३. पात्र होणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे लागेल.
४. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व ज्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा या प्रगत शाळा व शाळा सिध्दी प्रमाणे A ग्रेड आहेत व ज्या माध्यमिक शिक्षकांच्या वर्गाचा इ. ९ वी व इ. १० वी चा निकाल ८० % किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यांनाच वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहिल.

सेवांतर्गत वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणीसाठी पात्र ठरणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी विद्याप्राधिकरण, पुणे यांची राहील. तथापि, या प्रशिक्षणासाठीचा आवश्यक खर्च निधी हा शालेय शिक्षण विभाग / राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान/ सर्व शिक्षा अभियान /राज्य मंडळ, पुणे यांच्याकडून उपलब्ध करुन दिला जाईल. प्रशिक्षणाच्या आयोजनाची जबाबदारी विद्याप्राधिकरण, पुणे व जिल्हा व्यावसायिक सातत्यपूर्ण विकास संस्था यांची राहील.

उच्च माध्यमिक शिक्षकांकरिता देखील प्रभावी व परिणामकारक प्रशिक्षणाचा आराखडा तज्ज्ञ समितीमार्फत तयार करण्यात येईल व त्यानुसार उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये देखील आवश्यक बदल करण्यात येतील.

वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता देखील प्रशिक्षणाची परिणामकारकता या संदर्भातील शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१७ मधील सर्व तरतूदी या लागू राहतील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१०२३१८०००२९७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Nand Kumar

Digitally signed by Nand Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, cn=Nand Kumar
Date: 2017.10.23 17:49:28 +05'30'

**(नंदकुमार)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व महानगरपालिका आयुक्त
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
१५. अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. संचालक, विद्याप्राधिकरण, पुणे.
१८. संचालक, बालभारती, पुणे.
१९. सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२०. सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२२. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था
२३. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
२४. शिक्षण निरिक्षक, मुंबई (पश्चिम, दक्षिण, उत्तर)
२५. सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका
२६. सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
२७. सर्व गटशिक्षणाधिकारी
२८. सर्व मुख्याध्यापक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत
२९. निवड नस्ती, प्रशिक्षण